- प्रेस नोट -

दि. १६/१०/२०२६

शिवाजीनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.०८/१०/२०२६ रोजी ०१:१५ वा. ते ०१:३०वा. च्या दरम्यान फिर्यादी शेहबाज रियाज खान, वय-२५ वर्षे, धंदा-वेल्डींग काम, रा.ठी. बैंगनवाडी गोवंडी, मुंबई यांच्या वहिनी वय ३० वर्षे हिचे अटक आरोपी पुरुष वय-४० वर्षे याच्याशी प्रेमसंबंध असल्याच्या कारणावरुन वाद झाले होते तेंव्हा अटक आरोपी पुरुष वय-४० वर्षे हा फिर्यादींच्या घरी आला व शिवीगाळ करु लागला, त्यानंतर फिर्यादींच्या वडीलांनी त्याला अडवले असता त्याने धक्काबुक्की केली व फिर्यादींचे रुममध्ये येवुन त्याने त्याच्याजवळील चाकु काढुन शिवीगाळ करत जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने चाकूने फिर्यादींचे डोक्याच्या दिशेने वार केला असता तो फिर्यादीनी चुकवला व तो फिर्यादींचे डाव्या हाताच्या मनगटावर लागुन फिर्यादीला गंभीर दुखापत केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१५/१०/२०२६ रोजी गु.र.क्र.६४३/२६, कलम१०९(१), ११५(२),३५१(२),३५२ बीएनएस २०२३, सह कलम ३७(१)(अ),१३५ मपोका.१९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
